# पोलीस आयुक्तालय, अमरावती

## ई - पोलीस पत्रिका

दि ०८/०१/२०१८ अनु.क्र.०७/१८

## (अमरावती शहर पोलीसांची २०१८ ची उद्दिष्टे)

- जागरूक व तत्पर पोलीस.
- नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबलयुक्त व तणावमुक्त पोलीस दल.
- महिला, मुले व ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा.
- जातीय सलोखा वाढविणे.
- संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचेविरूद्ध कठोर कारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीस कोठडीत गुन्हे घडू न देणे.
- आरोपी पोलीसांचे ताब्यातून पळून जाऊ नयेत.
- “सुरक्षित व सुखकर अमरावती” हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातून साध्य करू

## भाग – 1

## नेमणुक/पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/रजा

**1.जा.क्र.पोआअ/पशा-1/रुग्ण्-कालावधी/पोउपायुक्त्-चव्हाण/149/2018 अम.दि. 05.01.2018**

**आदेश**

म.ना.से.रजा नियम 1981 मधील नियम 61 अन्वये वैदयकीय प्रमाणत्राचे अनुषंगाने श्री. प्रदिप चव्हाण, पोलीस उपायुक्त् (मुख्या.) अमरावती शहर दि. यांचा दि. 23.08.2017 ते 13.09.2017 पावेतोचा 22 दिवसाचा रुग्णनिवेदन कालावधी हा परावर्तीत रजा म्हणुन मंजुर करण्यांत येत आहे.

**2.जा.क्र. पोआअ/पशा-/पोउपआ-चव्हाण/164/2018 अमरावती शहर दि. 05.01.2018**

**आदेश**

श्री. प्रदीप चव्हाण, पोलीस उपायुक्त (मुख्या.) अमरावती शहर, यांना दि. 07.01.2018 रोजी 01 दिवसाची सुटी व मुख्यालय सोडण्याचे परवानगीसह मंजुर करण्यांत येत आहे.

श्री. प्रदीप चव्हाण, पोलीस उपायुक्त (मुख्या.) हे दिनांक 06.01.2018 रोजी मा. पोलीस महासंचालक, म.रा. मुंबई येथे आयोजीत चर्चासत्राकरीता जाणार असल्याने दि. 05.01.2018 चे मा.नं. पासुन ते दि. 07.01.2018 पावेतो पोलीस उपायुक्त, (मुख्या.) अमरावती शहर या पदाचा तात्पुरता अतिरीक्त् कार्यभार श्री. चिन्म्य पंडीत, भा.पो.से. पोलीस उपायुक्त्, परि-1, अमरावती शहर यांचेकडे सोपविण्यांत येत आहे.

**3.जा.क्र. पोआअ/आस्था/मयत/धमाले-पोहवा-1502/196/2018 अमरावती शहर दि. 05.01.2018**

**संदर्भ** :- सपोआ (वाहतुक) अमरावती शहर यंचे जा.क्र. सपोआ/वाहतुक/04/2018 दि. 04.01.2018

**विषय** :- पोहवा/1502 प्रफुल दत्तात्रय धमाले शहर वाहतुक शाखा (पश्चिम) अमरावती शहर यांचा मृत्यु झाल्याने सेवेतुन नाव कमी करण्याबाबत.

**आदेश**

पोलीस आयुक्त, अमरावती शहर या आस्थापनेवर कार्यरत असलेले पोहवा/1502 प्रफुल दत्तात्रय ध्माले नेमणुक शहर वाहतुक शाखा (पश्चिम) अमरावती शहर यांचा हदय विकाराने दि. 15.12.2017 रोजी मृत्यु झाला. आरोग्य् विभाग महानगर पालिका, अमरावती यांनी निर्गमीत केलेल्या मृत्यु प्रमाणपत्रावरुन त्यांचे नाव पोलीस आयुक्त अमरावती शहर या आस्थापनेवरुन दि. 16.12.2017 वे मध्यान्हापुर्व पासुन कमी करण्यांत येत आहे.

## वेतन/वेतनवाढ/वेतन निश्चिती/सुधारीत वेतन

## निरंक

## शिक्षा/निलंबन/पुन:स्थापना/बक्षिस

## शिक्षा

**1.क्र.पोआअ/विचौ-2/कसुरी/समज/आठवले-वश्रेलि/13954/2017अमरावती शहर दि. 24.12.2017**

**आदेश**

श्रीमती जयमाला आठवेल, वश्रेलि, पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती शहर यांचे विरध्द दोषारोपाच्या खालील बाबी बाबत महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) 1979 च्या नियम 10 नुसार कारवाई प्रस्तावित करण्यांत आली आहे.

**दोषारोपाच्या बाबी :-**

श्रीमती जयमाला आठवले वश्रेलि. हे पोलीस आयुक्त् कार्यालय, अमरावती शहर येथे पत्रव्यवहार शाखेत दि. 01.08.2016 पासुन मंत्रालयीन लिपीकवर्गीय कर्मचारी आस्थापरा या कार्यासनावर नेमणुकीस असतांना आपली पत्रव्यावहार शाखेतुन प्रबंधक शाखेत आवाक लिपीक या पदावर बदली झाली होती. दि. 04.10.2017 चे 16.00 वाजता नविन कार्यसनाचा कार्यभार ग्रहण करण्याबाबत सांगीतले असता , आपण कार्यभार घेण्यास नकार दिला असे सांगुन कार्यालय अधिक्षक, अमरावती शहर यांचा अपमान करुन गैरशिस्तीचे वर्तन केले . सदरची वागणुक वरिष्ठ श्रेणी पदाला अशोभनिय आहे.

उपरोक्त् कसुरी प्रकरणी आपल्या सेवाअभिलेखाचा विचार करता तसेच आपणास भविष्यात सुधारण्याची एक संधी देवून मी आपणास सक्षम प्राधिकारानुसार **समज** देण्यांत येत आहे.

**2.क्र. पोआअ/विचौ-1/पोनि. तावडे/पो.स्टे. प्रभार/अंआ/13851/2017अमरावती दि. 20.12.2017**

**वाचा :- का.दा.नो.**क्र. पोआअ/विचौलि/पोनि पाटील+1/9008/17, दि. 20.08.2017

**आदेश**

**कसुरदारचे नाव :- सपोनि.तावडे, तत्कालीन नेमणुक पो.स्टे. भातकुली, अमरावती शहर सध्या नेमणुक पोलीस अधिक्षक , पोलीस प्रशिक्षण केंद्र, सोलापुर**

**थोडक्यांत कसुरी :-**

पो.स्टे. प्रभारी अधिकारी म्हणुन नेमणुकीस असतांना सकाळ-संध्याकाळ पो.स्टे. च्या डायरीचा कार्यभार स्विकारणे नियमानुसार आवश्यक होते. परंतु, आपण तसे न करता स्टे. डा. कार्यभार दैनंदिन स्विकारत नसल्याबाबत दि. 18.08.2016 च्या स्टे.डा.च्या नोंदीवरुन दिसुन येते.

अशा तऱ्हेने स्टे.डा.चा कार्यभार दैनंदिनपणे न घेता वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांकडे दुर्लक्ष करुन कर्तव्यात कसुरी केला आहे. सुधारण्याची एक संधी देउन कारणे दाखवा नोटीस मध्ये प्रस्तावीत केलेल्या शिक्षेत पुर्णत: बदल करुन त्याऐवजी पोलीस (शिक्षा व अलीप ) नियम 1956 क्र. 3 (2) (1) चे तरतुदी नुसार भविष्यात अशा प्रकारची चुक होउ नये म्हणुन समज (ताकीद) देण्यांत येत आहे.

19 DEC 2017

क्र. - पोआअ/विचौ-१/प्राचौ/पोशि-११०६ सोळंके/अंआ/ 13790 /२०१७ अमरावती शहर, दि. /१२/२०१७

**वाचा :- का.दा.नो.** क्र. पोआअ/विचौ-१/पोशि विनोद सोळंकी/५७२३/१७, दि. २३/६/२०१७

## अंतिम आदेश

**कसुरदाराचे नांव :- पोना/११०६ विनोद पिरन सोळंके,** नेमणुक पोलीस मुख्यालय, अमरावती शहर

**थोडक्यात कसुरी :-**

तुम्ही, **पोना/११०६ विनोद पिरन सोळंके,**पो.स्टे. बडनेरा येथे नेमणुकीस असतांना दि. २७/९/२०१६ रोजी पो.स्टे. फ्रेजरपुरा येथील नाईट डयुटी ऑफीसर पोउपनि लभाने यांनी मिळालेल्या माहिती वरुन बियानी चौक अमरावती या घटनास्थळी भेट दिली असता, सदर घटनास्थळावर तुम्ही व इतर तुमचे दोन सहकारी इसम हे दारु पिऊन मद्यधुंद अवस्थेत मिळुन आले.

सदर प्रकरणी तुम्हाला घटनास्थळावरुन निघुन जाण्यास संबंधित पोलीसांनी सांगितले असता, तुम्ही काहीही एक न ऐकता आरडा ओरड करुन सार्वजनिक ठिकाणी शांततेचा भंग करीत होते त्यावरुन तुमचे विरुध्द पो.स्टे. फ्रेजरपुरा येथे एन.सी.क्र. १७८६/२०१६ कलम १८६ प्रमाणे तसेच ईस्तेगाशा क्र. १९५/२०१६ कलम ११२, ११७ मु.पो.का. अन्वये कार्यवाही करण्यात आली आहे.

सदर प्रकरणी तुमचे रक्ताचा नमुना वैद्यकिय पडताळणी करीता घेण्यात आला असता, तुमचे रक्तात **०.०५५ टक्के** अल्कोहोलचे प्रमाणे आढळुन आल्याने, पो.स्टे. फ्रेजरपुरा येथे तुमचे विरुध्द **अपराध क्र. ८०/२०१७ कलम ८५** महा.दारुबंदी कायद्याप्रमाणे दिनांक १/२/२०१७ रोजी दाखल करण्यात आला आहे.

अश्या तऱ्हेने तुम्ही दारु पिऊन सार्वजनिक ठिकाणी शांतता भंग करण्याचा प्रयत्न केला असुन शिस्तप्रिय अश्या पोलीस खात्यात लोकसेवक म्हणुन नेमणुकीस असतांना त्यांचे कोणतेही भान न ठेवता वरील प्रमाणे अत्यंत बेजबाबदार व बेशिस्तीचे गैरवर्तन केले आहे. तुमच्या या गैरवर्तनामुळे जनमानसात पोलीसांची प्रतिमा मलीन झाली आहे. आपल्या या कसुरी बाबत आपल्याला निलंबित करुन प्राथमिक चौकशी करण्यात आली. सदर प्राथमिक चौकशीमध्ये उपरोक्त पणे आपला कसुर निष्पन्न झाल्याने मुंबई पोलीस अधिनियम (शिक्षा व अपील) १८५६ नियम ३ पोटनियम (२) मधील (५) नुसार आपणास पुढील देय " वार्षिक वेतनवाढ दोन (२) वर्षा करीता का ? स्थगीत करण्यात येऊ नये " याकरीता तसेच दिनांक **१/१०/२०१६ ते २०/४/२०१६** पावेतोचा आपला निलंबित कालावधी जसाचे तसा का ? करण्यात येऊ नये म्हणुन सुध्दा सदरची कारणे दाखवा नोटीस उपरोक्त संदर्भान्वये देण्यात आली आहे. सदर नोटीस तुम्ही **दिनांक २/११/१७** रोजी स्विकारुन त्यावरील स्पष्टीकरण एक महिन्याचा कालावधी लोटुन सुध्दा आम्हास सादर केले नाही. तरी देखील तुमचा पुर्व सेवाभिलेख

विचारात घेता व भविष्याचा विचार करता तुम्हाला सुधारण्याची एक संधी देऊन का.दा.नो. मध्ये प्रस्तावित केलेल्या शिक्षेत अंशतः बदल करुन खालील नमुद शिक्षेचे अंतिम आदेश पारित करण्यात येत आहे.

## अंतिम आदेश

**पोना/१९०६ विनोद पिरन सोळंके,** नेमणुक पोलीस मुख्यालय, अमरावती शहर यांना उपरोक्त कसुर प्रकरणी मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) नियम १९५६ नियम क्रमांक ३ (२) (५) नुसार " **पुढील देय वार्षीक वेतनवाढ एक (१) वर्षा करीता स्थगीत करण्याची शिक्षा** " कायम करण्यात येत आहे. (सदर शिक्षेचा पुढील वेतनवाढीवर कोणताही परिणाम होणार नसुन शिक्षा कालावधी किरकोळ रजा सोडुन व ईतर सर्व रजा वगळुन असेल.)

तसेच सदर प्रकरणी असलेला तुमचा निलंबन कालावधी **दिनांक १/१०/२०१६ ते २०/४/२०१६** पावेतोचा हा " **जसाचे तसा** " नियमित करण्यात येत आहे.

सदर शिक्षेने कसुरदार व्यथीत होत असल्यास, अंतिम आदेश प्राप्त झाल्याचे तारखेपासुन ६० दिवसाचे आंत मा. पोलीस महासंचालक, म.रा., मुंबई यांना योग्य मार्फतीने अपिल अर्ज सादर करण्याची त्यांना मुभा आहे.

18 DEC 2017

क्र. - पोआअ/विचौ-१/प्राचौ /नापोशि-१०४६ बागडे+१/अंआ/13763/२०१७ अमरावती शहर, दि. /१२/२०१७

**वाचा :- का.दा.नो.** क्र. पोआअ/विचौ-१/कसुर/ निलंबन/कादानो/पोना बागडे+१/१०३०२/१७, दि. ११ /८/२०१७

## अंतिम आदेश

**कसुरदाराचे नांव :-** १) **पोना/१०४६ अनिल ऋषीराज बागडे,** नेमणुक पोलीस मुख्यालय, अमरावती शहर
२) **पोना/९१२ दत्तात्रय रंगरावजी ढोरे,** नेमणुक पोलीस मुख्यालय, अमरावती शहर

**थोडक्यात कसुरी :-**

१. तुम्ही, उपरोक्त नमुद कसुरदार पोलीस मुख्यालय, अमरावती शहर येथे नेमणुकीस आहात. दि. १/७/२०१६ पासुन तुम्ही पोलीस मुख्यालयात डयुटी मदतगारीचे कामकाज करीत असल्याचे वरिष्ठांचे निदर्शनास आलेवरुन त्याबाबत चौकशी केली असता, पो.मु. येथे डयुटी मदतगारीचे कामकाज करणेबाबत कोणताही वरिष्ठांचा लेखी आदेश तुमच्याकडे मिळुन आला नाही किंवा तो तुम्ही वरिष्ठांकडुन प्राप्त करुन घेण्याची तसदीसुध्दा घेतलेली नाही. सदर मदतगारीची डयुटी तुम्ही स्वमर्जीने व नियमबाहय पध्दतीने करीत असल्याचे वरिष्ठांचे निदर्शनास आलेवरुन रा.पो.नि. पो.मु. यांनी दि. ६/३/२०१७ रोजी डयुटी मदतगारीचे कामकाजासाठी तुमचा लेखी आदेश काढण्यात आला. अश्या तऱ्हेने तुम्ही दि. १/७/२०१६ ते ६/३/२०१७ या कालावधीमध्ये वरिष्ठांचा कोणताही लेखी आदेश नसतांना डुटी मदतगारीचे कामकाज करीत होते.

२. तसेच महानगरपालीका अतिक्रमण पथक अमरावती येथे दि. १६/५/२०१७ रोजी कर्तव्यावर गेलेले असतांना रा.पो.नि., पो.मु. यांची डयुटी पासवर अधिकृत सही न घेता स्वःमर्जीने सदर डयुटीवर निघुन गेलात. याबाबत स.पो.आ. प्रशासन विभाग यांनी तुमचा खुलासा मागविला असता, तो सुध्दा तुम्ही त्यांना सादर केला नसल्याचे दिसुन आले.

5

३. स.पो.आ. प्रशासन विभाग यांनी दि. १६/५/१७ रोजी पो.मु. येथे अचानक भेट देऊन डयुटी मदतगार कक्षातील तुम्ही हाताळीत असलेले दैनंदिन रजिस्टर व अंभिलेखाची पडताळणी केली असता, त्यामध्ये सिआर मोबाईल, एन.सी.सी. गार्ड , कोषागार गार्ड, इ.व्हि.एम. गार्ड, मालटेकडी पिकेट व नाकाबंदी या सारखी डयुटी ठराविक कर्मचाऱ्यांचीच लावण्यात येत असल्याचे निदर्शनात आले. सदर डयुटी लावतांना अधुनमधुन कर्मचारी बदलविणे आवश्यक होते. परंतु सदर बाब सुध्दा वरिष्ठांच्या निदर्शनास आणुन दिली नाही. तसेच डयुटी रजिस्टरचा अभिलेख दैनंदिनी लिहुन अद्यावत ठेवणे आवश्यक असतांना तो सुध्दा तुम्ही रोजच्या रोज नोंदी घेऊन अद्यावत ठेवला नाही.

अश्याप्रकारे तुम्ही डयुटी मदतगारीचे कर्तव्यात अत्यंत बेजाबाबदार व निष्काळजीपणा करुन हलगर्जीपणा केल्याच्या कसुराबद्दल चौकशीचे अधीन राहुन तुम्हास **दि. १९/५/१७ ते २७/६/१७** या कालावधीत निलंबनाधीन ठेवण्यात आले. सदर प्रकरणी केलेल्या प्राथमिक चौकशीत आपला कसुर निष्पन्न झाल्याने मुंबई पोलीस अधिनियम



(शिक्षा व अपील) १९५६ नियम ३ पोटनियम (२) मधील (५) नुसार तुम्हास पुढील देय " वार्षीक वेतनवाढ एक (१) वर्षा करीता का ? स्थगित करण्यात येवु नये." म्हणुन सदरची कारणे दाखवा नोटीस उपरोक्त संदर्भान्वये दि. ११/८/२०१७ रोजी देण्यात आली आहे. सदर नोटीस तुम्ही स्विकारुन विहीत मुदतीत आपले स्पष्टीकरण या कार्यालयास सादर केले आहे. आपल्या स्पष्टीकरणाचे आम्ही बारकाईने व काळपुर्वक अवलोकन केले असता, ते अंशतः समाधानकारक दिसुन आले असुन प्रस्तावित केलेल्या शिक्षेत बदल करण्याची आम्हाला आवश्यकता वाटली. तसेच तुमचा पुर्व सेवाभिलेख विचारात घेता व भविष्याचा विचार करता तुम्हाला सुधारण्याची एक संधी देऊन सदर का.दा.नो. मध्ये प्रस्तावित केलेल्या शिक्षेत बदल करण्यात येत असुन त्याऐवजी खालील नमुद शिक्षेचे अंतिम आदेश पारित करण्यात येत आहे.

## अंतिम आदेश

पोना/१०४६ अनिल बागडे व पोना/९१२ दत्तात्रय ढोरे यांना उपरोक्त कसुर प्रकरणी मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) नियम १९५६ नियम क्रमांक ३ (२) (२) नुसार " **सक्त ताकीद** " ही शिक्षा कायम करण्यात येत आहे.

तसेच सदर प्रकरणी असलेला तुमचा निलंबन कालावधी **दि. १९/५/१७ ते २७/६/१७ पावेतोचा** हा " **जसाचे तसा** " करण्यात येत आहे.

... आदेश प्राप्त झाल्याचे तारखेपासुन ६० दिवसाचे

18 DEC 2017

क्रमांक पोआअ/विचौ-१/विचौ/अंआ/पोशि -३९६ दिपक ठाकुर / 13748 /२०१७ अमरावती शहर दि. /१२/२०१७

# आदेश

वाचा :- का.दा.नो.क्र. पोआअ/विचौ-१/विचौ/अंआ/पोशि दिपक ठाकुर / /११६०९/२०१७ , दिनांक २९.९.२०१७

अपचारीचे नांव :- पोशि /३९६ दिपक चंद्रप्रकाश ठाकुर, नेमणुक पो.मु.अमरावती शहर

थोडक्यात कसुर :-

तुम्ही, अपचारी पोलीस शिपाई / ३९६ दिपक चंद्रप्रकाश ठाकुर, पोलीस मुख्यालय, अमरावती शहर येथे नेमणुकीस आहात. असे असतांना तुम्ही दिनांक २५. ०९. २०१४ पासुन आज पावेतो कोणत्याही प्रकारची वरीष्ठांना पुर्व सुचना न देता, सततपणे आपल्या कर्तव्यावरुन अनुपस्थित राहिला आहात. अपचारी वारंवार कर्तव्यावरुन अनुपस्थित राहत असल्याने, त्यांच्या या बेशिस्त, बेजबाबदार व गैरवर्तणुकीच्या दोषारोपा बाबत या कार्यालयाचे आदेश क्र. पोआअ / विचौलि / कसुरी / विचौ /पोशि-३९६ दिपक / ३६५ / २०१७ , दिनांक १०.१.२०१७ अन्वये त्यांचे विरुध्द विभागीय चौकशी करण्यात आलेली आहे. सदर विभागीय चौकशीचा समारोपिय अहवाल पोलीस निरीक्षक महिला सेल तथा विभागीय चौकशी अधिकारी (श्रीमती निलीमा आरज ) यांनी सादर केलेला आहे. त्यांच्या समारोपिय अहवालाचे व चौकशीतील इतर दस्तऐजांचे बारकाईन व काळजीपुर्वक अवलोकन केले असता, सदर विभागीय चौकशी दरम्यान अपचारी यांना चौकशी अधिकाऱ्यांनी बचावाच्या पुरेशा प्रमाणात संधी उपलब्ध करुन दिल्या आहेत, परंतु अपचारी यांनी सदर संधीचा सदुपयोग केलेला दिसत नाही.

अपचारी विरुध्दचे दोषारोप :-

१. अपचारी पोशि/३९६ दिपक चंद्रप्रकाश ठाकुर यांनी डॉ. श्री. नगराळे , बी.ए.एम.एस. संजीवनी क्लीनिक, उत्तम नगर अमरावती यांच्या दवाखान्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र घेवुन पत्नी सौ. स्वाती दिपक ठाकुर यांच्या मार्फतीने राखीव पोलीस मुख्यालय, अमरावती शहर यांना सादर केले. त्यावरुन रापोनि पोमु यांनी स्टे.डा. नोंद क्रं. २८/२०१४ ,दि. २५.०९.२०१४ अन्वये अपचारी यांच्या मागणी नुसार सिकपास देण्यात आली . अपचारी यांनी सिक पास घेतल्यानंतर तातडीने पोलीस हॉस्पिटल अथवा ईतर खाजगी दवाखान्यात जाऊन वैद्यकीय उपचारानंतर सक्षम प्राधिकाऱ्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र व इतर वैद्यकीय कागदपत्रे रापोनि पोमु यांच्या कडे आणुन दाखल करणे किंवा वरीष्ठ कार्यालयास सादर करणे आवश्यक होते. परंतु तसे न करता, अपचारी यांच्याकडे रापोनि पोमु यांनी वारंवार मागणी करुन सुध्दा ते सादर केले नाही.

२. अपचारी हे दिनांक २५.९.२०१४ पासुन आजपावेतो सततपणे एवढया प्रदिर्घ कालावधीत अनुपस्थित

(..२..)

त्यांनी एक दिवसही पोलीस मुख्यालय,अमरावती शहर येथे गणणेवर हजेरी दिली नाही किंवा येवु न शकण्याबाबत ठोस ठोस अश्या कारणाची माहिती स्वतः अथवा त्यांच्या त्यांच्या जवळचे - नातेवाईकांकरवी पोलीस मुख्यालयात अथवा वरीष्ठ कार्यालयास सादर केली नाही.

३. अपचारी यांना राखीव पोलीस निरीक्षक, पो.मु.अमरावती शहर यांनी कर्तव्यावर हजर होणे बाबत वेळो वेळी नोटीसेस पाठविण्यात आलेल्या आहेत. परंतु अपचारी यांनी त्याकडे दुर्लक्ष करुन कोणताही प्रतिसाद न देता, कर्तव्यावरुन सततपणे अनुपस्थित राहिले आहेत.

४. अपचारी यांच्या कर्तव्यावरील सततच्या अनुपस्थितीमुळे त्यांच्या दैनंदिन कर्तव्याचा अतिरिक्त ताण इतर सहकारी पोलीस कर्मचाऱ्यांवर पडत असुन त्याचे दुश्परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

५. अपचारी पोशि/३९६ दिपक चंद्रप्रकाश ठाकुर हे यापुर्वी सुध्दा अगदी नजीकचे काळात खालील नमुद कालावधीत अनधिकृतपणे कर्तव्यावरुन अनुपस्थित राहिल्याने, सदर कालावधीचा निर्णय बिनावेतन रजा करण्यात येवुन बेशिस्त , बेजबाबदारपणाचे गैरवर्तणुकी बद्दल त्यांचे विरुध्द वेतनवाढी स्थगित करणे बाबत शिक्षांची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

नजीकचे काळात अपचारी यापुर्वी कर्तव्यावरुन अनुपस्थित राहिल्याचा कालावधी :-

| | | | |
|---|---|---|---|
| १) दिनांक २/१/२०१३ | ते दिनांक ९/५/२०१३ | पावेतो | १२८ दिवस |
| २) दिनांक २२/५/२०१३ | ते दिनांक १६/१२/२०१३ | पावेतो | २०८ दिवस |
| ३) दिनांक १८.१२.२०१३ | ते दिनांक १/४/२०१४ | पावेतो | १०४ दिवस |
| ४) दिनांक १५/४/२०१४ | ते दिनांक २०/९/२०१४ | पावेतो | १५९ दिवस |
| | | एकुण | ५९९ दिवस |

यावरुन असे निष्पन्न होते की, अपचारी पोशि/३९६ दिपक चंद्रप्रकाश ठाकुर हे वारंवारपणे आपल्या कर्तव्यावरुन अनुपस्थित राहण्याच्या सवईचे आहेत. त्यांच्या विरुध्दच्या प्रस्तुत विभागीय चौकशी दरम्यान त्यांना बयाने नोंदविण्या करीता बोलावण्यात आले. परंतु ते विभागीय चौकशी अधिकारी यांच्या समक्ष हजर होत नसल्याने, सदर प्रकरणी अखेर चौकशी अधिकारी एकतर्फी कार्यवाही सुरु करीत असतांना अपचारी यांनी दिनांक २४.८.२०१७ रोजी त्यांचे लेखी बयान चौकशी अधिकारी यांना सादर केले. अपचारी यांनी विभागीय चौकशीमध्ये सादर केलेल्या बयानात नमुद आहे की, दिनांक २५.९.२०१६ रोजी कर्तव्यावर रुजु होण्याकरीता पो मुख्यालयात जातांना यशोदा नगर चौकातील मेडिकल स्टोअर्स मधुन औषधी घेण्याकरीता -

( ..३..)

गेलो व त्याठिकाणी गाडी उभी करुन औषधी घेतली. औषधी घेवुन बाहेर आलो असता, गाडीवर असलेली काळया रंगाची बॅग आढळुन आली नाही. परिसरातील लोकांना सदर बॅग बाबत विचारपुस केली असता, बॅग मिळुन आली नाही. सदर बॅग मध्ये सिकपास व इलाजाचे कागदपत्रे होती. सदर बॅग हरविल्याबाबत दैनिक वृत्तपत्रात जाहिरात देवुन सुध्दा बॅग मिळुन आली नाही. असे बयानात केले त्या पुढील वैद्यकीय उपचाराचे कागदपत्रे सादर करीत आहोत,असे नमुद केले.

अपचारी दिनांक २५.०९.२०१४ पासुन कर्तव्यावरुन सतत अनुपस्थित असतांना त्यांनी बॅग हरविल्याचे तारखेपावेतो ( दि. २५.९.२०१६) वैद्यकीय उपचारा बाबतचे कागदपत्रे तथा अन्य ठोस पुरावा रापोनि पो.मु.यांच्या कडे किंवा वरीष्ठ कार्यालयास सादर करणे अपेक्षीत असतांना सुध्दा त्यांनी हेतुपुरस्सरपणे कोणतेही वैद्यकीय कागदपत्रे सादर केलेली नाहीत. किंवा ते सादर करणे बाबत कोणताही प्रयत्न करण्यात आल्याचे दिसुन येत नाही .

अपचारी पोशि / ३९६ दिपक ठाकुर हे प्रदिर्घ काळापासुन कर्तव्यावर उपस्थित असल्याने, त्यांना उपस्थित होणे बाबत रा.पो.नि.पो.मु. अमरावती शहर यांनी वेळो वेळी नोटीसेस पाठविण्यात आल्या आहेत. परंतु अपचारी यांनी कर्तव्यावर उपस्थित होण्या बाबत कोणतीही तसदी घेतलेली नाही. प्रदिर्घ काळ कर्तव्यावरुन अनुपस्थित असतांना त्यांना कोणता आजार होता, याबाबत ठोस असा वैद्यकीय पुरावा सादर केला नाही. उपचारा दरम्यान ते आंतररुग्ण आहेत किंवा बाह्यरुग्ण आहेत या बाबत सुध्दा कोणतीही माहिती वरीष्ठांना अवगत केली नाही. उपचार घेत असल्याबाबत तसे बेडरेस्ट सर्टीफिकेट वेळो वेळी वरीष्ठांना सादर करणे आवश्यक असतांना ते सादर केले नाही. अश्या तऱ्हेने त्यांचे विरुध्दचे विभागीय चौकशीतील उपरोक्त दोषारोप क्र. १ ते ५ हे निर्विवादपणे सिध्द झालेले आहेत.

अपचारी यांच्या पुर्व सेवाभिलेखावर दृष्टीक्षेप टाकला असता, ते पोलीस विभागाच्या सेवेत दिनांक ३.११.२००४ रोजी भरती झाले असुन आज पावेतो त्यांच्या १३ वर्षाच्या कालावधीत यापुर्वी सुध्दा कर्तव्यावरुन अनुपस्थित राहण्याच्या दोषारोपावरुन या कार्यालयाचे आदेश दि. २९.६.२०१० अन्वये सेवेतुन काढुन टाकण्याची गंभीर शिक्षा देण्यात आली होती. तसेच पुन्हा कर्तव्यावरुन अनुपस्थित राहिल्याचे कारणास्तव दिनांक २१.४. २०११ च्या आदेशान्वये तीन (३) वर्षा करीता तसेच दिनांक २५.४.२०१६ च्या आदेशान्वये दोन (२) वर्षा करीता देय वार्षीक वेतनवाढ स्थगित करण्याच्या शिक्षा त्यांना करण्यात आलेल्या आहेत. तथापि, सदर शिक्षांचा अपचारी यांच्यावर कोणताही परिणाम झाल्याचे दिसुन येत नाही. अश्या तऱ्हेने अपचारी हे वारंवार वेग वेगळया कारणास्तव आपल्या कर्तव्यावरुन अनुपस्थित राहण्याच्या सवईचे असल्याने, पोलीस विभागाची सेवा करण्यात त्यांना कोणतेही स्वारस्य दिसुन येत नाही. आणि म्हणुन विभागीय चौकशी मध्ये त्यांच्या विरुध्दचे दोषारोप पुर्णतः निष्पन्न झाल्याने, विभागीय चौकशी अधिकारी यांच्या समारोपिय अहवालाशी आम्ही सहमत राहुन उपरोक्त दोषारोपा बाबत मुंबई पोलीस अधिनीयम १९५१ चे कलम २५ मधील प्राधिकारानुसार मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपील) नियम १९५६ मधील नियम क्र. ३ (१) (३) च्या

(..४...)

तरतुदी प्रमाणे अपचारी यांना " सेवेतुन बडतर्फ करणे " (Dismissal from Service ही शिक्षा का ? करण्यांत येवु नये, म्हणुन उपरोक्त संदर्भान्वये दिनांक २९.९.२०१७ रोजी कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. सदर नोटीस अपचारी यांनी दिनांक ४.१०.२०१७ रोजी स्विकारुन त्यावरील त्यांचे स्पष्टिकरण विहीत मुदतीत आम्हास सादर केले. अपचारी यांनी सादर केलेल्या स्पष्टीकरणाचे आम्ही बारकाईने व काळजीपुर्वक छाननी केली असता, ते समाधानकारक दिसुन आले नाही. दोषारोपा बाबत अपचारी यांचे म्हणणे एकुन घेण्याकरीता ते समक्ष हजर झालेवरुन दि. १३.११.२०१७ रोजी प्रत्यक्ष सुनावणी घेण्यात आली. त्यावेळी सुध्दा अपचारी यांचे समक्ष केलेले विवेचन असमाधानकारक दिसुन आले. तरी देखील त्यांच्या कौटुंबिक भविष्याचा विचार करता, कारणे दाखवा नोटीस मध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे सेवेतुन बडतर्फ करणे या शिक्षेत अंशतः बदल करुन त्या ऐवजी खालील नमुद अंतिम शिक्षेचे आदेश पारित करण्यात येत आहे.

## अंतिम आदेश

अपचारी पोशि / ३९६ दिपक चंद्रप्रकाश ठाकुर पोलीस मुख्यालय, अमरावती शहर यांच्या विरुध्दच्या विभागीय चौकशीतील दोषारोप संपुर्णतः निष्पन्न झाल्याने उपरोक्त कसुर प्रकरणी त्यांना मुंबई पोलीस ( शिक्षा व अपील) नियम १९५६ नियम ३ (१) (१-अ) चे तरतुदी प्रमाणे " सक्तीची सेवानिवृत्ती " ही शिक्षा करण्याचे कायम करण्यात येत आहे.

सदर शिक्षेने अपचारी व्यतीत होत असल्यास, प्रस्तुत आदेश प्राप्त झाल्याचे दिनांकापासुन ६० दिवसाचे आंत योग्य त्या मार्फतीने मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना अपील अर्ज सादर करण्याची मुभा त्यांना

# निवासस्थान/इमारत संबधी/संकीर्ण

निरंक

# वाढदिवसाच्या हार्दीक शुभेच्छा

खालील नमुद पोलीस अधिकारी/ कर्मचारी यांचा कार्यालयीन अभिलेखानुसार त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या तारखेस वाढदिवस असल्याने त्यांना पोलीस आयुक्त्, अमरावती शहर तसेच पोलीस आयुक्तलयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे तर्फे वाढदिवसाच्या हार्दीक शुभेच्छा देण्यांत येत आहे. तसेच वाढदिवस असलेल्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचे नांव पोलीस स्टेशनचे नोटीस बोर्डवर लिहुन हार्दीक शुभेच्छा द्याव्यात.

| अ.क्र. | हुद्दा | ब.नं | अधिकारी व कर्मचारी यांचे नांव | नेमणुक पो.स्टे. | वाढदिवसाचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| 1 | पोना | 1237 | श्री. मनोज यादव | मोपवि | 08.01.2018 |
| 2 | मपोना | 1010 | श्रीमती. विना मेश्राम | शवाशा राजापेठ | 08.01.2018 |
| 3 | पोशि | 1442 | श्री. मुकेश डांगरे | बि.डी.डी.एस. | 08.01.2018 |
| 4 | पोशि | 1529 | श्री. रुपेश काळे | क्यु.आर.टी. | 08.01.2018 |
| 5 | पोशि | 45 | श्री. संदीप चव्हाण | गाडगे नगर | 08.01.2018 |
| 6 | पोशि | 1846 | श्री. राहुल वंजारी | पोमुख्या. | 08.01.2018 |

Rathod 9-1-18
(डी. बी. राठोड)
प्रशासकीय अधिकारी,
पोलीस आयुक्त, अमरावती शहर
यांचे करीता

8.1.2018 9.1.18

प्रत,

मा. पोलीस आयुक्त,/पोलीस उपायुक्त (मुख्यालय) / पोलीस उपायुक्त परि-1,2/ सहाय्क पोलीस आयुक्त/ स्विय सहायक/प्रशासकीय अधिकारी/ सेवापट नोंदणी लिपीक आस्थापना शाखा यांना माहीती व आवश्यक कार्यवाहीकरीता..